<u>आर.सी.सी. क्र. १५६/२०२२</u>
<u>निशाणी क्र. ९</u>

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,
माझे नांव – विमल सोनबा खोसे,
वय – ५० वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – पाडळी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. घुगे यांचेमार्फत</u>–**

१. सोनबा खोसे हे माझे पती आहेत. घटना दि.१२.०८.२०२१ रोजी सकाळी ९.१५ वा. घडली. त्यादिवशी मी माझ्या घरुन किराणा माल आणणेसाठी आमच्या गावामध्ये चालले होते. माझे पती कांदयाच्या रोपाला पाणी देत होते. मी बबन खोसे याच्या घराच्या पाठीमागुन जात होते. त्यावेळी सुनिल खोसे हे पाठीमागुन आले व त्यांनी मला कवळी घालुन खाली पाडले व लाथाबुक्क्याने मारहाण केली. आमच्या गावामध्ये राजेशिवाजी पतसंस्था आहे. सुनिल खोसे यांनी राजे शिवाजी पतसंस्था मधुन कर्ज काढले होते व त्या कर्जासाठी माझे पती जामीनदार झाले होते. आम्हाला त्याबाबत नोटीस आली होती. माझे पती सुनिल खोसे याला म्हणाले की, कर्ज भरुन घ्या. त्यावर सुनिल खोसेने मला खाली पाडुन म्हणाला की, तुझा पती मला कर्ज भर म्हणत आहे मी कर्ज नाही भरणार नाही. तेव्हा त्याने एक सरपनाची काठी घेऊन मला डोक्यात व सर्व ठिकाणी बेशुध्द होईपर्यंत मारले. तो मला म्हणाला की, तुझ्या गांडीत पाय घालीन, तुला भोंगळी करुन मारीन. त्यावेळी तेथुन देविदास पोपट खोसे हा रस्त्याने जात होता. मी तेथे पडले होते. त्याने माझ्या पतीला फोन केला. पतीने मला खाजगी वाहनाने औटी हॉस्पीटल येथे दाखल केले. मी शुध्दीवर आल्यानंतर दि.१४.०८.२०२१ रोजी पोलीसांनी माझा जबाब नोंदविला. आता मला सदरचा जबाब दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या जबाबास **निशाणी क्र.१०** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

२. माझा यापुर्वी न्यायालयात जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. साक्षीदाराचा फौ.प्र.सं.कलम १६४ प्रमाणे नोंदविण्यात आलेल्या जबाबाचे पाकिट न्यायालयासमक्ष फोडण्यात आले. आता मला सदरचा जबाब दाखविण्यात आला. त्यातील मजकुर माझ्या

सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.११** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

<u>आरोपींतर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. संकेत ठाणगे यांचेमार्फत–</u>

३. माझ्या पतीचे व सुनिल खोसे यांचे घटनेच्या पुर्वी चार–पाच वर्षापासुन मैत्रीचे संबंध होते. मला लिहिता वाचता येते. दवाखान्यामध्ये मी माझा जबाब लिहिल्यानंतर वाचुन सही केली होती. त्यावेळेस मी सर्व हकिकत पोलीसांना सांगितली होती. त्यावेळेस काही सांगायचे राहुन गेले नव्हते. कर्जासंबंधीच्या नोटीसा माझ्या घरी वारंवार येत होत्या. हे म्हणणे खरे आहे की, राजे शिवाजी पतसंस्था कर्ज भरण्यासाठी वारंवार तगादा लावत होते. तसेच संस्थेवाले म्हणत होते की तुमच्या घराला आम्ही सिल लाऊ. हे म्हणणे खरे आहे की, सदर पतसंस्थेमुळे माझ्या पतीला त्रास होत होता. त्यामुळे माझे पती वारंवार सुनिल खोसेला पैसे भरण्यासाठी सांगत होते का हे मला माहित नाही. त्यामुळे माझे व माझ्या पतीमध्ये कर्जाबाबत चर्चा होत होती.

४. दर्याबाई पाडळी व पारनेर मधील अंतर किती किलोमीटर आहे हे मला सांगता येणार नाही. मला दवाखान्यात येईपावेतो व पती येईपावेतो दीड तास गेला हे मला सांगता येणार नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजुला वस्ती आहे. घटनास्थळावर विशाल खोसे यांचे घर आहे का मला सांगता येणार नाही. तसेच नामदेव दगडु खोसे यांचे घर तेथे आहे. तसेच रस्त्याच्या पलीकडे देखील वस्ती आहे.

६. मी दवाखान्यात केव्हा पोहोचले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२.०८.२०२१ रोजी मी घसरुन पडल्याने सकाळी ७.०० वा. औटी यांच्या दवाखान्यात गेले होते. हे म्हणण खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नसताना मी घसरुन पडले याचा गैरफायदा घेऊन आरोपीविरुध्द खोटी केस केली आहे. सदर केस झाल्यानंतर व सुनिल खोसे याला अटक झाल्यानंतर सुनिल खोसेने कर्ज भरले का हे मला सांगता येणार नाही. सदर गुन्हा घडल्यानंतर आरोपीला अटक झाल्यानंतर राजेशिवाजी पतसंस्थेच्या नोटीसा येणे बंद झाले का हे मला सांगता येणार नाही.

७. मी फौ.प्र.सं. कलत १६४ च्या जबाबामध्ये सांगितले की, आरोपीने मागुन येऊन माझी छाती दाबली व साडीत हात घातला, तुला नागडी करतो, ही बाब माझ्या जबाबात व तक्रारी अर्जामध्ये नमुद नाही. ते तसे का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपीने अशी भाषा वापरलीच नव्हती म्हणुन ती माझ्या जबाबात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बबन खोसे याच्या घराच्या पाठीमागुन जात होते त्यावेळी सुनिल खोसे हे पाठीमागुन आले व त्यांनी मला कवळी घालुन खाली पाडले व लाथाबुक्क्याने मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो मला म्हणाला की, तुझ्या गांडीत पाय घालीन, तुला भोंगळी करुन मारीन, त्यावेळी तेथुन देविदास पोपट खोसे हा रस्त्याने जात होता, मी तेथे पडले होते, त्याने माझ्या पतीला फोन केला, पतीने मला खाजगी वाहनाने औटी हॉस्पीटल येथे दाखल केले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला सरपनाचे काठीने मला डोक्याला व सर्व ठिकाणी मारले हे मी खोटे सांगत आहे. हे महणणे खरे नाही की, पतसंस्थेचे कर्ज भरण्यासाठी मी व माझ्या पतीने चर्चा करुन आरोपीवर खोटा गुन्हा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझा विनयभंग केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या भावकीतील असल्यामुळे आम्ही त्याचे नाव प्रस्तुत गुन्हयात गोवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या आधीपासुनच मी पारनेर येथे दवाखान्यात दाखल होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

sd/-

दिनांक- ०२.०४.२०२६

पारनेर

( एम. सी. शेख )

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,

न्यायालय क्र.१, पारनेर.

*(साक्षीदार हा अभियोगपक्षाला सहकार्य करत नसल्यामुळे अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी कलम १५४ भारतीय पुरावा कायदा नुसार देण्यात येत आहे.)*